आकाशवाणी नागपूर,
(मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार, दिनांक ०९ जून २०२४

## ठळक बातम्या

1. नरेंद्र मोदी आज संध्याकाळी घेणार सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ - भारतीय उपखंडातील राष्ट्रप्रमुख राहणार उपस्थित.
2. कृषिमंत्री धनंजय मुंडेंकडून राज्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी तक्रार व्हाट्सअप क्रमांक जारी- तक्रारदाराचं नाव गोपनीय ठेवणार.
3. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून नीट परीक्षेत देण्यात आलेल्या अतिरिक्त गुणांचं पुनरवलोकन करण्यासाठी चार सदस्यीय समितीची स्थापना.
4. केंद्र पुरस्कृत आवास योजनांच्या अंमलबजावणीत वर्धा जिल्ह्यातील पाच ग्रामपंचायतींची दमदार कामगिरी.

*****

पंतप्रधान शपथ विधी

नरेंद्र मोदी आज तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेणार आहेत. आज सायंकाळी होणाऱ्या शपथविधी सोहळ्याला शेजारील देशांतील अनेक नेत्यांना निमंत्रित करण्यात आलं असून श्रीलंकेचे अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे, मालदीवचे अध्यक्ष डॉ. मोहम्मद मुइज्जू, बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना, मॉरिशसचे पंतप्रधान प्रविंदकुमार जुगनाथ, नेपाळचे पंतप्रधान पुष्प कमल दहल प्रचंड आणि भूतानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे या समारंभाला उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे देखील शपथ समारंभास उपस्थित राहणार आहेत. सोबतच वंदे भारतचे लोको पायलट, सहाय्यक लोको पायलट, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नागरिकांनाही पंतप्रधान मोदी यांच्या शपथविधी सोहळ्याचं आमंत्रण देण्यात आलं आहे. आशियातल्या पहिल्या महिला लोको पायलट सुरेखा यादव, पश्चिम मध्य रेल्वेच्या प्रीती साहू, गोंदियाचे लोको पायलट स्नेहसिंह बघेल, नाशिकचे स्वच्छता दूत चंद्रकिशोर पाटील यांना देखील सोहळ्याला उपस्थित राहण्याचं निमंत्रण मिळालं आहे. तत्पूर्वी, नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी राजघाट इथं महात्मा गांधी, सदैव अटल इथं माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या

स्मृती स्थळांवर जाऊन श्रद्धांजली वाहिली. तसंच राष्ट्रीय समर स्मारक इथं अभिवादन केलं.

शपथविधी प्रसारण

राष्ट्रपती भवनात आज होणाऱ्या शपथविधी सोहळ्याचं थेट प्रसारण आकाशवाणी दिल्लीवरून संध्याकाळी पावणेसात वाजल्यापासून एफएम गोल्ड, इंद्रप्रस्थ आणि आकाशवाणी लाईव न्यूज 24X7 आणि युट्यूब वाहिनीवरून करण्यात येईल. अहमदाबाद, बेंगळुरू, चेन्नई, कटक, गुवाहाटी, हैदराबाद, इंफाळ, कोलकाता, मुंबई आणि तिरुअनंतपुरममधील आकाशवाणी केंद्रं त्यांच्या प्रादेशिक भाषांमधूनही हे प्रसारण करणार आहेत. त्यामुळे मुंबई केंद्राहून आज संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र सायंकाळी साडे ६ वाजता प्रसारित केलं जाईल.

एनडीए चहापान बैठक

'एनडीएवर लोकांनी विश्वास टाकला आहे. त्यासाठी जोमाने लोकसेवा करून भारताला २०४७ पर्यंत विकसित करण्याचं उद्दिष्ट साध्य करूया' असं प्रतिपादन काळजीवाहू पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. मोदी यांनी आज सकाळी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या नेत्यांसाठी सकाळी चहापानाचं आयोजन केलं होतं, त्यावेळी ते उपस्थितांना संबोधित करत होते. या बैठकीला अमित शहा, जे. पी. नड्डा, एस.जयशंकर, निर्मला सीतारामन, नितीन गडकरी, पीयूष गोयल, रक्षा खडसे, रामदास आठवले, ज्योतिरादित्य सिंधिया, चिराग पासवान यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सोनिया गांधी

'काँग्रेस आज लोकसभेत मोठा पक्ष म्हणून स्थापित झाला आहे. इंडिया ब्लॉकच्या भागीदारांमुळे काँग्रेस मजबूत झाली आहे,' असं प्रतिपादन काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांनी केलं. त्या आज काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकीत बोलत होत्या. भारत जोडो यात्रा आणि भारत जोडो न्याय यात्रा या ऐतिहासिक चळवळी होत्या. त्यांनी पक्षाला सर्व स्तरांवर नवसंजीवनी दिली असल्याचंही त्या म्हणाल्या.

नीट

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा नीट मध्ये दीड हजारांहून अधिक उमेदवारांना देण्यात आलेल्या अतिरिक्त गुणांचं पुनरवलोकन करण्यासाठी चार सदस्यीय समितीची स्थापना केली आहे. संघ लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष या समितीचे प्रमुख असतील, अशी माहिती आज नॅशनल टेस्टिंग एजन्सी **-NTA-** चे महासंचालक सुबोधकुमार सिंग यांनी पत्रकार परिषदेत दिली. ही समिती एका आठवड्यात आपल्या शिफारशी सादर करेल आणि त्यानुसार या उमेदवारांचे निकाल सुधारले जाऊ शकतात, असं सुबोधकुमार म्हणाले. वैद्यकीय प्रवेश चाचणी-नीटचा निकाल 4 जून रोजी जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर या निकालावर विद्यार्थी आणि शैक्षणिक संघटनांकडून आक्षेप नोंदविण्यात आले होते. अनेकांनी या प्रकरणी न्यायालयांमध्येही धाव घेतली आहे, तर ही परीक्षा नव्याने घेण्यात येण्याची मागणीही केली जात आहे.

कृषी तक्रार व्हाट्सअप क्रमांक

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी नुकताच राज्याच्या खरीप हंगामाच्या नियोजनाचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांसाठी 'कृषी तक्रार व्हाट्सप हेल्पलाईन क्रमांक' जारी करण्याचे निर्देश दिले, त्याप्रमाणे कृषी विभागाकडून **9822446655** हा व्हाट्सप क्रमांक जारी करण्यात आला आहे. राज्यात कुठेही कृषी निविष्ठा विक्रेते शेतकऱ्यांना विशिष्ट कंपनीचे बियाणे किंवा खत घेण्याची सक्ती करत असतील, बी-बियाणे, खते किंवा कीटकनाशकांची चढ्या भावाने विक्री करत असतील, अनावश्यक वस्तू खरेदी करण्याची सक्ती करत असतील, एखादे बोगस वाण विक्री करत असतील, किंवा अशा कोणत्याही तक्रारी शेतकऱ्यांनी दुकानाचे नाव, ठिकाण, तालुका, जिल्हा यांसह उपलब्ध असलेल्या पुराव्यासह **9822446655** या व्हाट्सअप क्रमांकावर पाठवाव्यात. त्या प्रत्येक तक्रारीची तातडीने दखल घेऊन, त्याची शहानिशा करून त्यावर कारवाई केली जाईल, त्याचबरोबर तक्रार देणाऱ्या शेतकरी बंधू-भगिनींचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाईल, अशी माहिती मुंडे यांनी दिली आहे.

भगवान बिरसा मुंडा पुण्यतिथी

भगवान बिरसा मुंडा यांच्या १४२व्या पुण्यतिथीनिमित्त सर्व स्तरांतून त्यांना अभिवादन केलं जात आहे. वयाच्या **25** व्या वर्षी त्यांनी देशासाठी बलिदान दिलं. कुशल नेतृत्व क्षमता आणि प्रबळ इच्छाशक्तीमुळे त्यांनी त्या काळातील बलाढ्य सरंजामदार आणि ब्रिटिशांविरुद्ध बंड केलं. 'झारखंड राज्यातील मुंडा आंदोलनाचे जनक तसेच आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी लढा देणारे लोकनायक, स्वातंत्र्य

सेनानी भगवान बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन' या शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे तर 'जल, जमीन, जंगलाचे रक्षणकर्ते, थोर क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांना पुण्यतिथीदिनी विनम्र अभिवादन!' या शब्दांत उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी बिरसा मुंडा यांना नमन केलं आहे.

जेईई एडव्हान्स निकाल

जेईई एडव्हान्स २०२४ चा निकाल आज सकाळी जाहीर झाला. आयआयटी दिल्लीच्या वेद लाहोटीने ३६० पैकी ३५५ गुण मिळवत अव्वल स्थान पटकावलं आहे. आयआयटीच्या अधिकृत संकेतस्थळावर, **jeeadv.ac.in** वर हा निकाल बघता येईल. यावर्षीची जेईई एडव्हांन्स मद्रास आयआयटीनं घेतली होती. या निकालानंतर आयआयटी मधल्या अनेक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी उद्यापासून काउंन्सिलिंग फेरी सुरू होईल.

बियाणे आणि खतांचा साठा

खरिप हंगामासाठी खते आणि बियाण्यांचा पुरेसा साठा उपलब्ध असून शेतकऱ्यांनी शंभर मिलीमिटर पाऊस पडेपर्यंत पेरणीला सुरुवात करू नये. विभागात सोयाबीन, कापूस, तूर आदी बियाण्यांना मागणी असून 20 लाख 89 हजार 788 संकरित कापूस पॅकेट आणि सोयाबीनचं 1 लाख 40 हजार 364 क्विंटल बियाणे उपलब्ध असल्याची माहिती नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिली. खरीप हंगामासाठी पुरेशी खतांची उपलब्धता आहे. विभागासाठी 6 लाख 40 हजार 100 मेट्रीक टन विविध खतांचे वितरण मंजूर झाले असून 4 लाख 35 हजार 399 मेट्रीक टन खतांची उपलब्धता आहे. त्यापैकी 36 हजार 640 मेट्रीक टन खतांची विक्री झाली असून 3 लाख 98 हजार 759 मेट्रिक टन साठा म्हणजेच 152 टक्के खतांचा साठा विभागासाठी उपलब्ध आहे, असं त्यांनी सांगितलं. खरीप हंगामासाठी नागपूर विभागात 3 लक्ष हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच कापूस पिकाखाली 6 लक्ष 50 हजार हेक्टर क्षेत्र, तूर पिकाखाली 1 लक्ष 88 हजार, भात पिकाखाली 8 लक्ष 50 हजार क्षेत्राचा समावेश आहे.

आवास योजना पुरस्कार

‘अमृत महाआवास अभियान २०२२-२३’ अंतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना आणि राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी

करणाऱ्या तालुक्यांची निवड विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने नुकतीच केली. केंद्र पुरस्कृत आवास योजनांच्या अंमलबजावणीत सर्वोत्तम कामगिरी करत गोंदिया जिल्ह्यातील आमगाव तालुक्याने नागपूर विभागात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. गोंदिया तालुका द्वितीय तर नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्याने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या अंमलबजावणीत गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुका प्रथम स्थानी राहिला. नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर आणि रामटेक तालुक्यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविला. आवास योजनांच्या अंमलबजावणीत वर्धा जिल्ह्यातील पाच ग्रामपंचायतींनी दमदार कामगिरी केली आहे. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनांच्या अंमलबजावणीत पहिले दोन्ही क्रमांक वर्धा जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी पटकाविले आहेत. कारंजा तालुक्यातील काजळी प्रथम स्थानावर तर आष्टी तालुक्यातील आनंदवाडी दुसऱ्या स्थानावर आहे. चंद्रपूर जिल्ह्याच्या मूल तालुक्यातील राजगड ग्रामपंचायतीने तिसरा क्रमांक पटकाविला आहे. त्याचप्रमाणे राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या अंमलबजावणीत पहिल्या तिन्ही क्रमांकावर वर्धा जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी मोहोर उमटविली आहे. हिंगणघाट तालुक्यातील दोंदुडा ग्रामपंचायत प्रथम, आष्टी तालुक्यातील देलवाडी द्वितीय तर कारंजा तालुक्यातील बोरी ग्रामपंचायत तृतीय स्थानावर आहे.

टी-२० विश्वचषक

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अ गटात आज भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे. न्यूयॉर्क इथल्या नासॉ काउंटी स्टेडियमवर भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी आठ वाजता हा सामना सुरू होईल. भारतानं याआधीच्या सामन्यात आयर्लंडवर आठ गडी राखून विजय मिळवला आहे, तर पाकिस्तानच्या संघाला अमेरिकेच्या संघाकडून पराभव पत्करावा लागला आहे.

हवामान

मागील चोवीस तासांत गोंदिया आणि गडचिरोली वगळता सर्व जिल्ह्यांचं तापमान ४० अंशाच्या पुढे राहिलं. विदर्भात काल सर्वाधिक तापमान नागपूर इथं ४१.६ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं. नागपूर, वर्धा, यवतमाळ आणि वाशीम इथं काल पावसानं हजेरी लावली. येत्या ४ दिवसांत पूर्व आणि मध्य भारताच्या काही भागात उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे.

*****